| | |
|---|---|
| MHKO110008442012 | **नियमित दिवाणी दावा क्र. ३३३/२०१२**<br>**आदेश निशाणी क्र. ११७**<br>**(श्री. नाना शिवा कांबळे विरुध्द**<br>**श्रीमती हिराबाई रंगराव कांबळे वगैरे )** |

वादी यांनी सदरचा अर्ज वादी क्रमांक ३ सिताराम शिवा कांबळे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की , सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे . सदरचा दावा चालू असताना वादी क्रमांक ३ सिताराम शिवा कांबळे हे दिनांक २५/०७/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमूद **१.**श्रीमती अलका सिताराम कांबळे- पत्नी, **२.** विकास सिताराम कांबळे-मुलगा, **३.**सविता पोपट मस्के- मुलगी, **४.** मनिषा शशिकांत बनसोडे-मुलगी असे कायदेशिर वारस आहेत . प्रस्तुत वादी क्रमांक ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेतलेस प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही , परंतु सदरचे वारस रेकॉर्डवर न घेतलेस वादींचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे , त्यांचे कायदेशीर हक्क डावलले जाणार आहे सबब त्यांनी अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाचे मागील बाजूस म्हणणे देऊन प्रसतुत अर्जास हरकत घेतलेली आहे. प्रतिवादी यांचे मते, सदरचा अर्ज मुदतीत नसून अर्जासोबत अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज दिलेला नाही . सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे हिताविरुध्द होणार आहे. सबब त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

**४.** अर्ज, म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ३ मध्ये वादी मयत झालयास त्याच्या कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणेची तरतूद आहे . तसेच सदरहू नियमाप्रमाणे वादीच्या मृत्यूपश्चात दावा चालविणेचा अधिकार अबाधित रहात असेल तर त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेची तरतूद आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे . दाव्याचे स्वरुप पाहता वादीच्या मृत्यूनंतरदेखिल दावा चालविणेचा अधिकार अबाधित रहातो. तसेच नि. ११८/१ वरील मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी क्रमांक ३ सिताराम शिवा कांबळे हे दिनांक २६/०७/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यानंतर वादी यांनी दिनांक १३/१०/२०२२ रोजी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे . मुदतीच्या कायदयातील तरतूदींचे अवलोकन करता वादीच्या मृत्यूनंतर ९० दिवसांत अर्ज दाखल

करणेची तरतूद आहे. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता सदरचा अर्ज हा मुदतीत दिसून येतो. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे काही नुकसान होणार नाही . उलटपक्षी नामंजूर केल्यास दावेतील गुंतागुंत वाढून वादींवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे . परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**- आ दे श -**

**१.** अर्ज निशाणी क्र. ११७ मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांनी अर्जात नमुद वादी क्रमांक ३ चे वारसाबाबत १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.

**३.** अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करणेत येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2022.11.18 11:46:49 +0530

ठिकाण – पेठवडगांव

दिनांक -१७/११/२०२२

( एस.डी.शिरसाट)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पेठवडगांव